जिल्हा शिक्षक पुरस्कार विजेत्यांचा गौरव सोहळा संपन्न >>पान 2

ठाकरे लोकांसाठी नाही तर परिवारासाठी एकत्र आलेले आहेत : खा. श्रीकांत शिंदे >>पान 3

शिंदखेडा तालुक्यात टॉवरवर चढून शेतकऱ्याचे अनोखे आंदोलन >>पान 4


**सुविचार**

नेहमी नवीन शिकण्याची तयारी ठेवा.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 79 ■ गुरूवार, दि. 16 ऑक्टोबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




वादानंतर 'मनाचे श्लोक' चित्रपटाचे नाव बदलले:धार्मिक संघटनांच्या विरोधानंतर निर्णय, नवीन नावासह १६ ऑक्टोबरला होणार प्रदर्शित

आतील पान

# मंत्री बाबासाहेब पाटील यांचा गोंदियाच्या पालकमंत्रीपदाचा राजीनामा

दैनिक आपला विदर्भ

**गोंदिया/प्रतिनिधी :** राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी गोंदियाचं पालकमंत्री पद सोडलं आहे. आता इंद्रनील नाईक गोंदियाचे नवीन पालकमंत्री असणार आहेत. इंद्रनील नाईक गोंदियाचे नवीन पालकमंत्री असणार आहेत. अजित पवार यांची वरळी येथे पार पडलेल्या जिल्हाध्याकक्षांच्या बैठकीत ही घोषणा करण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वी नागपूर येथील पक्षाच्या शिबिरात प्रफुल पटेल यांनी पालकमंत्री जिल्ह्यात येत नाही केवळ १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारीला येतात अशी टीका केली होती, त्यानंतर आता या फेरबदलांची राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.

## इंद्रनील नाईक गोंदियाचे नवीन पालकमंत्री

मिळालेल्या माहितीनुसार, बाबासाहेब पाटील यांनी काल (मंगळवारी) गोंदियाचा पालकमंत्री पद सोडलं आहे. तब्येतीचे कारण देत त्यांनी पालकमंत्री पद सोडलं आहे. त्यानंतर आता इंद्रनील नाईक हे गोंदियाचे पालकमंत्री असणार आहेत. पालकमंत्री पद मिळवण्यासाठी अनेक जण आग्रही असतात, मात्र बाबासाहेब पाटील यांनी पालकमंत्री पद सोडलं आहे.

काही दिवसांपूर्वीच बाबासाहेब पाटील यांच्या गुडघ्याचं ऑपरेशन झालेलं आहे. त्यांना सातत्याने पायाचा प्रॉब्लेम येत असल्यामुळे लांबचा प्रवास होत नाही असं कारण त्यांनी दिलं आहे. तरी नुकताच नागपूरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचा एक भव्य मेळावा पार पडला होता. त्या मेळाव्यामध्ये भाषण करताना खासदार प्रफुल पटेल यांनी विदर्भातील पालकमंत्री वेळ देत नाहीत, २६ जानेवारी आणि १५ ऑगस्टसाठी फक्त येतात. इतर वेळी पालकमंत्री जिल्ह्यात येत नाहीत असं म्हणत जोरदार टीका केली होती, त्याचबरोबर तेथील पदाधिकारी आणि नेते आहेत त्यांना सोबत घेत नाहीत अशी टीका केली होती. हीच किनार या पालकमंत्री पदाला आहे का अशी चर्चा सुरू आहे.

बाबासाहेब पाटील यांनी पालकमंत्री पद सोडल्यानंतर आता राज्यमंत्री इंद्रनील नाईक आता गोंदियाचे नवीन पालकमंत्री असतील त्यांच्याकडे जबाबदारी देण्यात आली आहे. इंद्रनील नाईक विदर्भातील मंत्री आहेत. त्यांना गोंदियाला जाणं सोयीस्कर राहू शकतं. त्यामुळे त्यांच्यावर जबाबदारी सोपवली आहे अशी माहिति स्वतः अजित पवारांच्या वतीने देण्यात आली आहे. बाबासाहेब पाटील यांनी जेव्हा पालकमंत्री पदाची चाचपणी सुरू होती तेव्हा त्यांच्या जिल्ह्याचे पालकमंत्री पद मागितलं होतं. मात्र ती



मागणी पूर्ण होऊ शकली नव्हती. हसन मुश्रीफ आणि बाबासाहेब पाटील यांना स्वतःचे जिल्हा न मिळल्याने त्यांचा सुरुवातीपासून नाराजीचा सूर होता. त्याच बरोबर हसन मुश्रीफ यांनी विदर्भातील एका जिल्ह्याचं पालकमंत्री पद सोडलं होतं, आता बाबासाहेब पाटील यांनी गोंदियाचं पालकमंत्री पद सोडलं आहे.

## ई-केवायसीसाठी लाडक्या बहिणींसमोर अडचणींचा डोंगर!

**मुंबई/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत प्रत्येक लाभार्थी महिलेला ई-केवायसी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. ई-केवायसीसाठी लाडक्या बहिणींसमोर अडचणी निर्माण झाल्या आहेत. संकेतस्थळावर वारंवार एरर येत असून, ओटीपी येत नसल्याने लाडक्या बहिणींच्या अडचणीत वाढ झाली आहे.

ई-केवायसीच्या माध्यमातून पात्र लाभार्थी महिलांची राज्य सरकारने पडताळणी सुरू केली आहे. यासाठी राज्यभरातील लाखो महिलांनी लाडकी बहीण योजनेसाठी नोंदणी केली. आता केवायसीसाठी दोन महिन्यांची मुदत शासनाने दिली आहे. यात ई-केवायसी करण्यासाठी प्रत्येक स्तर सविस्तरपणे सांगितला जात आहे. मात्र, संकेतस्थळ सुरळीत चालत नसल्याच्या अनेक तक्रारी वाढल्या आहेत.

ई-केवायसीच्या संकेतस्थळावर क्लिक केल्यावर त्याला सुरू व्हायला खूप विलंब लागतो. कसेतरी सुरू झाले तर साईडवरून ओटीपी पाठविला असता मोबाइलवर ओटीपी येत नाही. त्यामुळे अनेक महिला तासनतास आपल्याजवळ मोबाइल घेऊन ओटीपीची वाट बघत बसतात. त्यामुळे लाडक्या बहिणींची गैरसोय होत आहे. अनावधानाने मोबाइलवर ओटीपी आला तर तो ओटीपी टाकायचा कुठे? हा प्रश्न निर्माण झाला आहे. ओटीपी टाकण्यासाठी संकेतस्थळावर बॉक्स उपलब्ध नाही. यामुळे लाडक्या बहिणींना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

महिलांना ई-केवायसी प्रक्रिया करण्यास विलंब लागत आहे. ई-केवायसी प्रक्रिया करताना ओटीपी येत नसल्याच्या तक्रारीही मोठ्या प्रमाणात समोर येत असून, या समस्या सोडवून ही प्रक्रिया सुलभ करावी आणि ई-केवायसीची तारीख वाढवावी, अशी मागणी लाडक्या बहिणींकडून केली जात आहे.

# ठाकरे बंधू ते जयंत पाटील, थोरातांनी पुरावे मांडले

**निवडणूक आयोगाच्या कारभाराची पोलखोल, मतदार यादीमधील घोळ समोर आणला**

**मुंबई/प्रतिनिधी : ज्येष्ठ काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी निवडणूक आयोग (केंद्रीय आणि राज्य) आणि मतदारयादीमधील दोषांबाबत गंभीर मुद्दे उपस्थित यामध्ये राजकीय हस्तक्षेप होत असल्याचा आरोप केला. विधानसभेला ज्या मतदारयाद्या होत्या त्यामध्ये प्रचंड दोष होते. आम्ही त्याच कालखंडामध्ये सांगूनही त्या दोषांसह निवडणूक पार पडल्याचे थोरात म्हणाले. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी राज्य आणि केंद्रीय निवडणूक आयोगाच्या प्रतिनिधींची भेट घेतल्यानंतर संयुक्त पत्रकार परिषद घेतली. यावेळी बोलताना थोरात यांनी बोगस मतदारांवरून गंभीर आरोप केला. काल आम्ही केंद्रीय निवडणूक आयोगाला, आज राज्य निवडणूक आयोगाला भेटलो.**

>>पान ३



## खामगावमध्ये बॅंगलिफ्टरची साखळी फेकली; एसबीआय बॅंकेसमोरून दोन परप्रांतीय चोरटे अटकेत



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव शहरात परप्रांतीय चोरट्यांची वाढती सक्रियता पोलिसांसाठी मोठा धोक्याचा इशारा बनली आहे. शनिवारी विशेष शाखेच्या डी बी पथकाने एसबीआय बॅंकेसमोर संशयित व्यक्तींवर लक्ष ठेवून कारवाई केली आणि दोन बॅंगलिफ्टर आरोपींना पकडले.चौकशीदरम्यान हे दोघे सोनू उमाशंकर सिंग असून, त्यांनी आधीच विविध ठिकाणी चोरी तसेच बॅग लिफ्टिंगचे गुन्हे केले असल्याचे उघड झाले. पोलिसांच्या सतर्कतेमुळे मोठा आर्थिक अनर्थ टळला.

तपासात आरोपींनी अकोला जिल्ह्यातील आकोट भागात ५० हजार रुपयांची बॅग लंपास केल्याची कबुली दिली. अकोला पोलीस स्टेशनमध्ये चौकशी केली असता, त्यांच्या विरोधात आधीच दोन गुन्हे नोंदवलेले असल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी दोघांना पुढील कार्यवाहीसाठी अकोट पोलीसांच्या ताब्यात दिले आहे.

खामगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रामकृष्ण पवार यांनी सांगितले, ''शहरातील सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी डी बी पथक सतत गस्त घालत आहे. नागरिकांनी आपली मालमत्ता सुरक्षित ठेवावी आणि संशयास्पद व्यक्ती दिसल्यास त्वरित पोलीसांकडे माहिती द्यावी.''

शहरातील रहिवाशांनीही पोलिसांचे आवाहन ऐकून सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. सार्वजनिक ठिकाणी आपली खिसे आणि वस्तू सुरक्षित ठेवणे, तसेच अनोळखी व्यक्तींवर लक्ष ठेवणे ह्या काळात खूप महत्त्वाचे आहे.

# नितीश कुमारांच्या जदयुकडून ५७ उमेदवारांची पहिली यादी जाहीर, विधानसभेच्या मैदानात एकही मुस्लिम नाही

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पडघड वाजू लागले असतानाच बिहारमध्ये विधानसभा निवडणुकांसाठी उमेदवारांच्या नावांची यादी प्रकाशित होत आहे. भाजपने २४३ सदस्य संख्या असलेल्या बिहार विधानसभेच्या निवडणुकांसाठी ७१ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. त्यानंतर, नितीशकुमार यांच्या जदयु पक्षाने ५७ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. त्यामध्ये, २७ नव्या



चेहऱ्यांना संधी देण्यात आली असून ११ उमेदवार हे गत २०२० च्या निवडणुकीत पराभूत झाले होते, त्यांनाही नव्याने तिकीट देण्यात आलं आहे. जदयुच्या पहिल्या उमेदवार यादीत एकही मुस्लिम चेहरा मैदानात उतरवरण्यात आला नसल्याचेही दिसून येत आहे.

बिहार विधानसभा २०२५ आता काही दिवसांवर येऊन ठेपली असून भाजप-जदयु युतीकडून उमेदवारांची नावे जाहीर केली जात आहेत. नितीश कुमार यांच्या पक्षाने ५७ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. या यादीतून सर्वच जातींना स्थान देण्याचं काम जदयुने केलं आहे. मात्र, पहिल्या यादीत एकही मुस्लिम उमेदवार नाही. तर, ४ महिलांनाही विधानसभेच्या मैदानात उतरवण्यात आलं आहे. जदयुने मधेपुरा येथून कविता साहा, गायघाट येथून कोमल सिंह, समस्तीपूर येथून अश्र्वमेध देवी, आणि विभूतीपूर येथून रविना कुशवाह या चार महिलांना तिकीट देण्यात आलं आहे. नितीश कुमार यांनी कोईरी आणि कुर्मी समाजाला प्राधान्याने स्थान देत २१ पेक्षा जास्त उमेदवार >>पान ३

## एसटी बॅंकेच्या सभेत राडा! सदावर्ते गट आणि शिवसेना कार्यकर्त्यांमध्ये फ्री स्टाईल हाणामारी, वाद पोलीस ठाण्यात

**मुंबई/प्रतिनिधी :** एसटी बॅंकेच्या बैठकीमध्ये सदावर्ते गट आणि शिवसेना शिंदे गटाचे अडसूळ यांच्या कार्यकर्त्यांमध्ये मोठा राडा झाला आहे. या बैठकीच्या दरम्यान दोन्ही गटाचे कार्यकर्ते एकमेकांना भिडले. यामध्ये चार ते पाच संचालक जखमी झाल्याची माहिती आहे. या दोन्ही गटाचा वाद आता नागपाडा पोलीस ठाण्यात पोहोचला असून एकमेकांविरोधात तक्रारी देण्यात आल्या आहेत.दिवाळीच्या पार्श्र्वभूमीवर एसटी बॅंकेची मिटिंग बोलवण्यात आली होती. त्यामध्ये दिवाळी बोनस वाटपाची चर्चा करण्यात आली. याच मुद्द्यावरून सदावर्ते गट आणि अडसूळ गट यांच्यामध्ये मतभेद झाले आणि नंतर त्याचे रुपांतर हाणामारीमध्ये झालं. एसटी बॅंकेच्या संचालकांच्या बैठकीमध्ये बाहेरुन आलेली माणसे बसवण्यात आल्याचा आरोप अडसूळ गटाकडून करण्यात येत आहे.

# बुलढाण्यातील केळी उत्पादकांचा जोरदार आवाज: अंजनगाव बोर्डाने बुरहानपूर-रावेर प्रमाणे भाव द्यावा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील अंजनगाव बोर्ड क्षेत्रातील केळी उत्पादक शेतकऱ्यांनी आपल्या हक्काच्या भावासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर जोरदार आंदोलन केले. रविवारी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वाखाली शेकडो शेतकऱ्यांनी उपस्थिती दर्शवत प्रशासनाकडे आपली मागणी मांडली.

शेतकऱ्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अंजनगाव बोर्डातील केळीला बुरहानपूर-रावेर बोर्डा प्रमाणे योग्य दर मिळावा. ''केळीला






योग्य भाव मिळालाच पाहिजे!'', ''शेतकऱ्यांचा हक्क द्या!'' अशा घोषणांनी जिल्हाधिकारी कार्यालय परिसर दणाणून टाकला.

या आंदोलनामध्ये उपस्थित शेतकऱ्यांनी प्रशासनाचे लक्ष त्यांच्या गंभीर आर्थिक परिस्थितीकडे वेधले. अनेक शेतकरी आपल्या घरखर्चासाठी आणि कर्जफेडीसाठी योग्य बाजारभावाची अपेक्षा करत आहेत, परंतु केळीचा भाव निम्न असल्यामुळे त्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी सांगितले की, ''शेतकऱ्यांना न्याय मिळणे अत्यंत आवश्यक आहे. अंजनगाव बोर्डाने बुरहानपूर-रावेर प्रमाणे केळीला भाव द्यावा. अन्यथा, शेतकऱ्यांच्या कष्टाचे फळ योग्य रीतीने मिळणार नाही.''

जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात उपस्थित शेकडो शेतकऱ्यांनी प्रशासनाला निवेदन दिल्यानंतर आपले प्रश्न आणि समस्या थेट मांडल्या. शेतकऱ्यांच्या या आंदोलनाने परिसरातील वातावरण गरमावले, तसेच प्रशासनाला शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे त्वरीत लक्ष देण्याची गरज अधोरेखित केली. अंजनगाव बोर्ड आणि स्थानिक प्रशासनाकडून या मागण्यांकडे कितपत गांभीर्याने उत्तर मिळेल, हे पुढील दिवसांत स्पष्ट होईल. शेतकऱ्यांचा आवाज आणि हक्काची लढाई अजून सुरूच आहे.

>>पान २

## डोनाल्ड ट्रम्प यांना नोबेल पुरस्कार नाहीच

जागतिक पातळीवर सर्वोच्च मानल्या जाणाऱ्या नोबेल पुरस्काराची घोषणा दरवर्षी ऑक्टोबरच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात केली जाते. मानव कल्याणासाठी झटणाऱ्या विविध क्षेत्रातील शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, लेखक आणि जागतिक पातळीवर शांततेसाठी कार्य करणाऱ्या व्यक्तीस किंवा संस्थेस हा पुरस्कार दिला जातो. यावर्षी या पुरस्काराकडे सगळ्या जगाचे लक्ष लागले होते कारण यावर्षीचा शांततेचा नोबेल पुरस्कार मलाच मिळणार असा ( फाजील ) आत्मविश्र्वास अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना होता. तसे त्यांनी अनेकदा बोलूनही दाखवले होते त्यामुळे त्यांना खरंच हा पुरस्कार मिळेल का? याची उत्सुकता जगभर होती. शांततेच्या नोबेल पुरस्काराची घोषणा शुक्रवारी दहा ऑक्टोबरला झाली आणि त्यावरील सस्पेन्स संपला. शांततेचा नोबेल पुरस्कार अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना मिळालाच नाही. यावर्षीचा शांततेचा नोबेल पुरस्कार मिळाला तो व्हेनेझुएलाच्या मारिया कोरिना मचाडो यांना आणि मचाडो यांना पुरस्कार का मिळाला यापेक्षा ट्रम्प यांना पुरस्कार का मिळाला नाही याचीच जगभर याची चर्चा झाली. डोनाल्ड ट्रम्प यांनी हा पुरस्कार मलाच मिळणार यासाठी मी सात युद्धे थांबवली व जगात शांती निर्माण केली अशी सातत्याने वल्गना करून एकप्रकारे नोबेल पुरस्कार समितीवर दबाव आणण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या दबावाला नोबेल पुरस्कार समिती बळी पडली नाही. त्यांनी योग्य निर्णय घेत डोनाल्ड ट्रम्प यांना हा पुरस्कार नाकारीत योग्य व्यक्तीला पुरस्कार दिला याबद्दल नोबेल पुरस्कार समितीचे कौतुकच करायला हवे. डोनाल्ड ट्रम्प यांना हा पुरस्कार हवा होता त्यासाठी त्यांनी मोठा थयथयाट केला. सातत्याने मी सात युद्धे थांबवली अशी वल्गना केली मात्र अमेरिकेनेच अनेक देशांना फुस लावून युद्धाच्या गर्तेत ढकलले हे लपून राहिले नाही. आधी भांडण लावून देणे आणि नंतर ते सोडवण्याचे नाटक करणे त्यातून आपला स्वार्थ साधणे हेच अमेरिकेचे धोरण आहे. डोनाल्ड ट्रम्प असो की अमेरिकेचे याआधीचे राष्ट्राध्यक्ष त्यांनी इतर देशांकडे फक्त आपल्या शस्त्रास्त्रांचे गिऱ्हाईक म्हणून पाहिले. आपली शस्त्रास्त्रे विकली जावीत यासाठी अमेरिकेने अनेक देशात युद्ध पेटवली हा इतिहास आहे. आता हेच पाहा ना... भारत पाकिस्तानचे युद्ध मीच थांबवले अशी शेखी मिरवणारे व त्याद्वारे नोबेल पुरस्कारावर हक्क सांगणारे डोनाल्ड ट्रम्प पाकिस्तानला घातक शस्त्रात विकणार असल्याची बातमी नुकतीच वर्तमानपत्रात वाचली आता. जर डोनाल्ड ट्रम्प हे खरंच शांततेचे भोक्ते असते तर त्यांनी पाकिस्तानला शस्त्रास्त्रे का विकली असती ? पाकिस्तान या शस्त्रांचा वापर भारताविरोधात करणार जर पाकिस्तानने हे शस्त्र भारताविरुद्ध वापरले तर भारतही त्याला उत्तर देणार मग पुन्हा संघर्ष उफाळणार. जर ही शस्त्रे दहशतवाद्यांच्या हातात पडली तर भारतासोबतच संपूर्ण जगाला धोका पसरू शकतो. मग पाकिस्तानसारख्या दहशतवादी देशांना शस्त्रे विकून जगभर अशांतता पसरवणाऱ्या ट्रम्प यांना शांततेचा नोबेल पुरस्कार कसा मिळणार ? म्हणूनच नोबेल पुरस्कार समितीने घेतलेला हा निर्णय अतिशय योग्य आहे. ज्या मारिया माचाडो यांना हा पुरस्कार देण्यात आला त्या त्याच्या हकदार होत्याच. मारिया मचाडो या हॉवर्ड विद्यापीठातील पदवीधर आहेत आणि त्यांच्या व्हेनेझुएला देशातील हुकुमशाही विरुद्ध त्यांनी आवाज उठवला आहे. भ्रष्ट हुकुमशाही विरुद्ध स्वतःचा जीव धोक्यात घालून लढणाऱ्या मारिया मचाडो या लोकशाहीचा आवाज आहेत. मागील वर्षी या देशात निवडणुका झाल्या. या निवडणुकीत मचाडो या उभ्या राहिल्या मात्र त्यांना निवडणुकीत उभे राहण्यापासून रोखण्यात आले. त्यांना अपात्र घोषित करून त्यांचे राजकारण संपवण्याचा प्रयत्न करण्यात आला. पण त्या सरकारच्या या दमनशाहिला दबल्या नाहीत. त्यांनी या विरोधात आवाज उठवला. संपूर्ण देशाला हुकुमशाही विरुद्ध एकत्र केले. देशात लोकशाही टिकावी म्हणून जीव धोक्यात घालून लढल्या त्यामुळेच त्यांची या पुरस्कारासाठी झालेली निवड सर्वार्थाने योग्य आहे. डोनाल्ड ट्रम्प आणि मारिया मचाडो यांची तुलना होऊ शकत नाही. लोकशाहीच्या नावाखाली हुकुमशाही राबवणारे ट्रम्प या पुरस्कारासाठी पात्र ठरूच शकत नाही म्हणूनच नोबेल पुरस्कार समितीच्या या निर्णयाचे जगभर कौतुक होत आहे.

# जिल्हा शिक्षक पुरस्कार विजेत्यांचा गौरव सोहळा संपन्न

## शिक्षणातून बुलढाण्याचा नावलौकिक वाढवा

**दैनिक आपला विदर्भ**





**बुलढाणा/प्रतिनिधी :** ग्रामीण भागातील समाज व्यवस्थेचे रूपांतर करण्याचे सामर्थ्य शिक्षणात आहे. ही धुरा समर्थपणे पार पाडणाऱ्या शिक्षकांनी बुलढाणा जिल्ह्याचा नावलौकिक वाढवावा, असे आवाहन आमदार संजय गायकवाड यांनी केले

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्यावतीने आयोजित जिल्हा शिक्षक गौरव पुरस्कार सोहळा आज गर्दे वाचनालय सभागृहात पार पडला. या प्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बी. एम. मोहन, उपमुख्य कार्यकारी अधिकारी आशीष पवार, शिवशंकर भारसाकळे, प्रमोद एंडोले, मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रकाश राठोड, डॉ. जगराम भटकर (प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था), समाजकल्याण अधिकारी डॉ. अनिता राठोड, शिक्षणाधिकारी विकास पाटील, अनिल आकाळ, डॉ. वैशाली ठग, जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक सतीश देशमुख, कृषी विकास अधिकारी पुरुषोत्तम अनगाईत, तसेच जिल्हा परिषदेचे विभाग प्रमुख, गटविकास अधिकारी आणि गटशिक्षणाधिकारी उपस्थित होते.

आमदार श्री. गायकवाड म्हणाले की, शिक्षक हे समाज परिवर्तनाचे खरे वाहक आहेत. केवळ वर्गखोल्यांतील शिक्षणापुरते मर्यादित न राहता, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी प्रयत्न केले पाहिजेत. पुरस्कार हा केवळ सन्मान नसून तो एक जबाबदारीही आहे. गौरव प्राप्त शिक्षकांनी आपले ज्ञान इतर शाळांपर्यंत पोहोचवावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात म्हणाले की, जिल्हा परिषद प्रशासन सर्व शाळांच्या गुणवत्ता वाढीसाठी कटिबद्ध आहे. निपुण महाराष्ट्र आणि मिशन झेड या उपक्रमांद्वारे ग्रामीण विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. शाळेतील शिक्षण हे केवळ पुस्तकातील अभ्यासापुरतेच मर्यादित न राहता प्रत्येक विद्यार्थ्यांचा कलागुण आणि व्यक्तिमत्त्व विकास याकडेही प्रत्येक शिक्षकांने लक्ष दिले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या पट नोंदणी सोबतच शाळेतील उपस्थिती व गुणवत्ता या बाबींकडे प्रशासनाकडून विशेष लक्ष केंद्रित केल्या जाणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

**७० शिक्षकांचा सपत्नीक गौरव**

या समारंभात सन २०१८–१९ ते २०२४–२५ या सहा वर्षांतील ७० शिक्षकांचा सपत्नीक शाल, श्रीफळ, साडी, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. या सोहळ्यात ''मिशन झेड'' उपक्रमात योगदान देणाऱ्या शिकवणी संस्था संचालक आणि जनजागृतीसाठी कार्य करणाऱ्या कलावंतांचा सत्कार करण्यात आला. तसेच ''निपुण महाराष्ट्र'' उपक्रमात संपूर्ण राज्यात बुलढाणा जिल्ह्याने तृतीय क्रमांक मिळवल्याबद्दल डॉ. जगराम भटकर, शिक्षणाधिकारी विकास पाटील, अनिल आकाळ आणि डॉ. वैशाली ठग यांचा मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अरविंद शिंगाडे यांनी तर आभार प्रदर्शन उपशिक्षणाधिकारी अनिल देवकर यांनी केले. गौरव प्राप्त शिक्षकांनी प्रशासन आणि शिक्षण विभागाचे आभार मानत आपल्या भावना व्यक्त केल्या.

# चेन्नईच्या साईभक्ताकडून शिर्डी साईबाबांना एकूण ४८ लाखांची देणगी

**दैनिक आपला विदर्भ**

**शिर्डी/प्रतिनिधी :** सोने–चांदीचे भाव गगनाला भिडत असले तरी, शिर्डी साईबाबांवरील भक्तांची श्रद्धा मात्र अजूनही अढळ आहे. याचा प्रत्यय पुन्हा एकदा आलाय. चेन्नई येथील साईभक्त जितेंद्र उमेडी या परिवाराने साईबाबांच्या चरणी तब्बल ४८ लाख रुपयांची देणगी अर्पण केलीय. २५ लाख रु. किमतीची सोन्याचा मुलामा असलेली छत्री आणि २३ लाख रुपये रोख स्वरूपात साईबाबांना अर्पण करण्यात आले आहेत.

चेन्नई येथील सुवर्ण व्यवसाय करणारे जितेंद्र उमेडी हे गेली अनेक वर्ष साईबाबांचे भक्त आहेत. साईबाबांना सोन्याची एखादी वस्तू अर्पण करण्याची त्यांची मनोमन इच्छा होती. अखेर त्यांनी ती इच्छा पूर्ण करत आज शिर्डी साईबाबा संस्थानाला सोन्याचा मुलामा असलेली भव्य छत्री अर्पण केली. ही छत्री तयार करण्यासाठी सुमारे १८५ ग्रॅम सोनं आणि तांबं वापरण्यात आलं असून या छत्रीचं एकूण वजन १५ किलो आहे. छत्रीवर सुंदर नक्षीकाम आणि कोरीव काम करण्यात आलं आहे. याशिवाय उमेडी यांनी शिर्डी साईबाबा संस्थानच्या मेडिकल फंडसाठी २३ लाख रुपये रोख स्वरूपात देणगी म्हणून दिले आहेत. अशाप्रकारे एकूण ४८ लाख रुपयांची देणगी साईबाबा संस्थानाला अर्पण करण्यात आल्याची माहिती, देणगीदार साईभक्त जितेंद्र उमेडी यांनी दिली.

साईबाबांच्या मूर्तीवरील आधीची छत्री काढण्यात आली असून आज उमेडी या भाविकाने दिलेली नवीन छत्री साईबाबांच्या दुपारच्या मध्याह्न आरतीवेळी साईबाबांच्या डोक्यावर बसवण्यात आली. या छत्रीचे मूल्यांकन गोल्ड व्हॅली संस्थेकडून करण्यात आल्यानंतर या छत्रीची अधिकृत किंमत साईबाबा संस्थानच्या वतीनं निश्चित केली जाणार असल्याचं संस्थानचे उपकार्यकारी अधिकारी भीमराज दराडे यांनी सांगितलं. साईबाबा संस्थानाला देणगी देणारे साईभक्त जितेंद्र उमेडी आणि त्यांचा पत्नी चिताक्ष उमेडी यांचा साईबाबा संस्थानच्या वतीनं साईबाबांची मूर्ती आणि शाल देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी साईबाबा संस्थानचे उपकार्यकारी अधिकारी भीमराज दराडे, प्रशासकीय अधिकारी संदीपकुमार भोसले, जनसंपर्क अधिकारी दीपक लोखंडे, प्रशांत सूर्यवंशी उपस्थित होते.

# पांढरी काठी : दृष्टिहीनांच्या आत्मविश्वासाचा प्रकाशमार्ग



जगात डोळे हे ज्ञानाचे, अनुभूतीचे आणि ओळखीसाठीचे सर्वात सामर्थ्यवान माध्यम मानले जाते. परंतु या डोळ्यांशिवायही अनेक व्यक्ती जग पाहतात ते मनाच्या डोळ्यांनी, संवेदनांच्या माध्यमातून, अनुभवाच्या प्रकाशातून. या अशा दृष्टिहीन व्यक्तींच्या स्वावलंबनाचे, सन्मानाचे आणि सामाजिक समानतेच्या अधिकाराचे प्रतीक म्हणजे पांढरी काठी होय. म्हणूनच दरवर्षी १५ ऑक्टोबर हा दिवस 'जागतिक पांढरी काठी दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ दृष्टिहीनांच्या सन्मानाचा नाही, तर समाजातील प्रत्येक व्यक्तीने त्यांच्या स्वातंत्र्यपूर्ण जीवनाचा आदर करावा, याची आठवण करून देणारा आहे.

पांढऱ्या काठीचा इतिहास विसाव्या शतकाच्या आरंभीचा आहे. १९२१ मध्ये, इंग्लंडमधील ब्रिस्टॉल शहरातील छायाचित्रकार जेम्स बिग्स यांनी अपघातामुळे दृष्टी गमावली आणि रस्त्यावर सुरक्षितपणे चालण्यासाठी आपल्या चालण्याच्या काठीला पांढरे रंग लावले, ज्यामुळे ती वाहनचालकांना दिसू शकली. १९३१ मध्ये, फ्रान्समधील गिल्ली दहर्बेमाँट यांनी पांढऱ्या काठीचा वापर दृष्टिहीनांसाठी सुरू केला. १९३१ मध्ये पॅरिसमध्ये झालेल्या एका समारंभात त्यांनी दोन पांढऱ्या काठी दृष्टिहीनांना दिल्या, ज्यात एक अंध सैनिक आणि एक अंध नागरीक होते. यानंतर ५,००० पांढऱ्या काठी फ्रान्समधील अंध सैनिक आणि नागरिकांना वितरित करण्यात आल्या. या घटनांमुळे पांढरी काठी दृष्टिहीनांसाठी एक महत्त्वपूर्ण चिन्ह बनली, ज्यामुळे त्यांची सुरक्षितता आणि स्वातंत्र्य सुनिश्चित करण्यात मदत झाली. या काठीचा रंग पांढरा ठरविण्यामागे एक समाजशास्त्रीय विचार होता तो म्हणजे पांढरा रंग म्हणजे प्रकाश, शांती, सन्मान आणि दृष्टीचे प्रतीक होय. हा रंग इतर वाहनचालकांना किंवा नागरिकांना दृष्टिहीन व्यक्ती असल्याची ओळख देतो. १९६४ साली अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष लिंडन बी. जॉन्सन यांनी अधिकृतरीत्या १५ ऑक्टोबर हा म्हणून जाहीर केला. पुढे तो दिवस आंतरराष्ट्रीय पातळीवर म्हणून साजरा होऊ लागला. आज या दिवशी जगभरातील संस्था, सरकारे आणि स्वयंसेवी संघटना दृष्टिहीनांच्या स्वावलंबनासाठी कार्य करणाऱ्या उपक्रमांचे आयोजन करतात.

पांढरी काठी ही केवळ चालण्याचे साधन नाही, ती स्वाभिमानाचे प्रतीक आहे. दृष्टिहीन व्यक्तीला आपल्या आजूबाजूच्या वातावरणाची जाणीव करून देणारी ही काठी त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. काठीच्या साहाय्याने ते रस्त्यांवर सुरक्षितपणे चालू शकतात, अडथळे ओळखू शकतात, दिशांचा अंदाज घेऊ शकतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले, तर पांढरी काठी ही 'स्वावलंबनाचे' आणि 'समानतेचे' प्रतीक आहे. दृष्टिहीन व्यक्तीला मदतीवर अवलंबून राहावे लागत नाही, तर तो स्वतःच्या सामर्थ्याने समाजात मुक्तपणे वावरतो. हीच खरी 'दृष्टी' आहे त्यांच्यामध्ये आत्मविश्वासाची, स्वातंत्र्याची आणि मानवी प्रतिष्ठेची.

जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार, जगभरात सुमारे २८५ दशलक्ष लोक काही ना काही प्रकारच्या दृक्दोषाने ग्रस्त आहेत, त्यापैकी अनेक लोक पूर्णतः दृष्टिहीन आहेत. भारतातही दृक्दोषाचे प्रमाण चिंताजनक असून, अनेक लाख लोक विविध प्रकारच्या दृष्टिदोषाने प्रभावित आहेत. या परिस्थितीवर लक्ष केंद्रीत करण्यासाठी सरकार आणि स्वयंसेवी संस्था नेत्रदान, मोफत शस्त्रक्रिया, शिक्षण व रोजगार यासारख्या उपक्रमांद्वारे उपाययोजना करत आहेत. ग्रामीण भारतात अंधत्वाचे प्रमाण अधिक आहे, कारण आरोग्य सुविधा, जागरूकता आणि नेत्रोपचार या क्षेत्रांमध्ये अजूनही मोठी दरी आहे. राष्ट्रीय अंधत्व निर्मूलन कार्यक्रम अंतर्गत भारत सरकारने अनेक प्रयत्न सुरू केले आहेत. नेत्रदानाचे अभियान, मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरे, दृष्टिहीनांसाठी शिक्षण व रोजगारसंधी यावर लक्ष केंद्रीत केले जात आहे. परंतु समाजाच्या मानसिकतेत बदल घडविणे हे सर्वात मोठे आव्हान आहे.

आजचा काळ माहिती आणि तंत्रज्ञानाचा आहे, आणि या क्षेत्रात दृष्टिहीनांसाठी संधीचे नवे दरवाजे उघडले आहेत. ब्रेल लिपी, स्क्रीन रीडर सॉफ्टवेअर, टॉकिंग बुक्स, ऑडिओ–लायब्ररीज, ॲप–बेस्ड नेव्हिगेशन सिस्टम्स यामुळे दृष्टिहीन व्यक्ती आता शिक्षण, व्यवसाय, प्रशासन, संगणकशास्त्र, संगीत, कला, पत्रकारिता अशा अनेक क्षेत्रांत पुढे जात आहेत. भारतातील नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर द एम्पॉवरमेंट ऑफ पर्सन्स विथ व्हिज्युअल डिसॅबिलिटीज, देहरादून हे संस्थान दृष्टिहीनांसाठी प्रशिक्षण, संशोधन व मार्गदर्शन पुरविते. महाराष्ट्रात हेलन केलर इन्स्टिट्यूट फॉर ब्लाइंड, नाशिक ब्लाइंड स्कूल, पुण्यातील नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड अशा संस्था दृष्टिहीनांच्या शिक्षणासाठी आणि सामाजिक समावेशनासाठी कार्यरत आहेत.



'पांढरी काठी' ही अनेक देशांत कायद्याने मान्यता प्राप्त आहे. भारतात, २०१६ अंतर्गत दृष्टिहीन व्यक्तींना शिक्षण, रोजगार, वाहतूक, सार्वजनिक सुविधा आणि मतदानाचा समान अधिकार दिला आहे. सार्वजनिक ठिकाणी ब्रेल संकेत, साउंड सिग्नल्स, स्पर्शवाचक नकाशे, आणि सुरक्षित पादचारी मार्ग या सुविधा पुरविणे ही सरकारची जबाबदारी ठरविण्यात आली आहे. पांढरी काठी वापरणाऱ्या व्यक्तींचा सन्मान राखणे हे केवळ कायदेशीर नव्हे, तर नैतिक कर्तव्य आहे. पादचारी किंवा वाहनचालकांनी रस्त्यावर पांढरी काठी पाहिली, तर त्यांनी थांबून त्या व्यक्तीला सुरक्षित मार्ग द्यावा, हा चा मूलभूत नियम आहे.

समाजातील अंधश्रद्धा आणि पूर्वग्रह हे दृष्टिहीनांच्या प्रगतीसमोरील सर्वात मोठे अडथळे आहेत. 'अंधत्व म्हणजे अपंगत्व नव्हे', हे जनमानसात रुजविणे आवश्यक आहे. दृष्टिहीन व्यक्ती आपल्या संवेदना, बुध्दी आणि प्रतिभेच्या जोरावर समाजाचे महत्त्वाचे घटक ठरू शकतात, हे अनेक उदाहरणांनी सिद्ध केले आहे. जगप्रसिद्ध पियानिस्ट रे चार्ल्स, गायिका स्टीव्ही वंडर, भारतातील डॉ. बेनजामिन दोरिसवामी किंवा दीपक महालांकर यांसारख्या व्यक्तींनी अंधत्वावर मात करून जीवनाचे नवे आदर्श निर्माण केले. हे सर्व दाखवून देतात की काठीचा रंग पांढरा असला तरी त्या मागचा आत्मविश्वास मात्र तेजस्वी आहे.

जागतिक पांढरी काठी दिन हा केवळ स्मरणदिन नाही; तो एक जागरूकता चळवळ आहे. या दिवशी शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था आणि शासन विविध उपक्रमांद्वारे जनजागृती करतात. जसे की दृष्टिहीनांसाठी वॉकाथॉन, पांढऱ्या काठीच्या रॅली, सार्वजनिक परिसंवाद, कार्यशाळा आणि प्रेरणादायी कार्यक्रम. याचा हेतू समाजाला सांगणे हा आहे की दृष्टिहीन व्यक्ती दया किंवा सहानुभूतीच्या नाही, तर सन्मानाच्या पात्र आहेत.

शेवटी, पांढरी काठी ही अंधत्वाचे प्रतीक नाही, तर मानवी दृढनिश्चयाचे प्रतीक आहे. ती अंधारातही आशेचा दिवा प्रज्वलित करते, निर्बंधांना आव्हान देते आणि प्रत्येक दृष्टिहीन व्यक्तीला स्वतःच्या सामर्थ्यावर चालण्याची प्रेरणा देते.जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात, प्रत्येक रस्त्यावर, प्रत्येक मनात जर आपण पांढऱ्या काठीला सन्मानाने वाव दिला, तर ते समाज म्हणून आपल्या प्रगल्भतेचे द्योतक ठरेल. जागतिक पांढरी काठी दिन हा आपल्याला शिकवतो की दृष्टी फक्त डोळ्यांत नसते; ती मनात, आत्म्यात आणि माणुसकीत असते. म्हणूनच या १५ ऑक्टोबरला, पांढऱ्या काठीचा सन्मान करा, दृष्टिहीनांच्या हक्कांचा आदर करा आणि समाजात 'दृष्टी' म्हणजेच 'संवेदना' हा खरा प्रकाश आहे, ही जाणीव पसरवा.

**डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**मो. क्र. ९९६०१०३५८२**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# ठाकरे लोकांसाठी नाही तर परिवारासाठी एकत्र आलेले आहेत : खा. श्रीकांत शिंदे



दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** ठाणे ग्रामीण विकास आढावा बैठकीनंतर खासदार श्रीकांत शिंदे यांनी महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर भाष्य करताना विरोधकांवर जोरदार टीका केली. ''ठाकरे बंधु लोकांसाठी नव्हे, तर आपल्या परिवारासाठी एकत्र आलेले आहेत,'' असा टोला त्यांनी लगावला.

**केंद्र सरकारच्या योजनांचा आढावा**

आज ठाणे ग्रामीण विभागातील आढावा बैठक पार पडली. या बैठकीला सर्व खासदार, आमदार तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीत केंद्र सरकारच्या विविध योजनांवर सविस्तर चर्चा झाली. प्रधानमंत्री आवास योजना, स्वच्छ भारत मिशन, स्मार्ट सिटी प्रकल्प, जलजीवन मिशन यांसारख्या योजना जिल्ह्यात कशाप्रकारे राबवल्या जात आहेत, याचा आढावा घेण्यात आला. शिंदे म्हणाले, ''प्रधानमंत्री आवास योजना जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. कल्याणसह इतर भागांमध्येही प्रकल्प पूर्णत्वास गेले असून नागरिक त्या घरांमध्ये वास्तव्यास गेले आहेत. आता ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीतही ही योजना प्रभावीपणे राबविण्याची तयारी सुरू आहे.''

**महाविकास आघाडीवर टीका**

महाविकास आघाडीवर टीका करताना शिंदे म्हणाले, ''लोकसभेत यश मिळालं तेव्हा हेच लोक म्हणत होते की निवडणुका बॅलेट पेपरवर घ्या. पण आता विधानसभेत निकाल प्रतिकूल लागल्यावर ईव्हीएम मशीन दोषी ठरवत आहेत. हे दुटप्पी धोरण लोक ओळखत आहेत.''

**मतदार याद्यांवर काम सुरू**

दुबार मतदार याद्यांबाबत विचारले असता शिंदे म्हणाले, ''सध्याच्या प्रारूप याद्यांवर आमचे कार्य सुरू आहे. त्यातील त्रुटींवर आक्षेप घेऊन दुरुस्त्या करण्यात येत आहेत.''

**ठाकरे बंधुंच्या एकतेवर प्रतिक्रिया**

''ठाकरे बंधु लोकांसाठी एकत्र आलेले नाहीत, तर फक्त आपल्या परिवाराच्या हितासाठी आलेले आहेत. हे मी वारंवार सांगतो आहे,'' असे शिंदे यांनी स्पष्ट केले.

**निवडणुकांबाबत प्रतिक्रिया**

आगामी निवडणुकांवर बोलताना शिंदे म्हणाले, ''निवडणुका दोन-दोन, पाच-पाच वर्ष पुढे ढकलल्या गेल्या आहेत. अजून किती पुढे ढकलणार? जेव्हा निवडणुका होत नव्हत्या तेव्हा 'निवडणुका घ्या' म्हणणारे आता निवडणुका लागल्यावर घाबरत आहेत. कारण त्यांना ठाऊक आहे की लोक त्यांच्याबरोबर नाहीत. त्यामुळे निवडणुका होण्याआधीच त्रुटी शोधायच्या आणि लोकांमध्ये गैरसमज निर्माण करायचे, अशी त्यांची सवय झाली आहे.''

शेवटी श्रीकांत शिंदे यांनी ठामपणे सांगितले की, ''जनतेचा विश्वास आमच्यावर आहे. विकासाच्या माध्यमातून ठाणे जिल्हा देशात आदर्श म्हणून उभा करण्याचे आमचे ध्येय आहे.''

## पान एक वरून..

### ठाकरे बंधू ते जयंत पाटील, थोरातांनी पुरावे मांडले

एकत्रित बैठक केली. परंतु, आमचं काही समाधान त्यामध्ये झालेलं नाही. त्यांनी स्पष्टपणे उत्तर आम्हाला दिलेलं नाही ही वस्तुस्थिती आहे, असे थोरात म्हणाले.

बाळासाहेब थोरात म्हणाले की, काही नावे वगळली गेली. काहींचे परत परत नावे दिसत आहेत. एका घराच्या नावावर अनेक आहेत. थोरात यांनी सांगितलं की, माझं एखाद कॉलेज आहे किंवा माझ कॉलेज हॉस्टेल आहे त्या कॉलेजचे बाहेरून राज्यातून आलेले आलेली मुलं सुद्धा माझे मतदार असं होणार असेल. निवडणूक आयोग ते मान्य करून घेणार असेल आणि ते शेवटच्या क्षणापर्यंत तक्रार करूनच त्याची दखल नाही. अशा स्थितीत अनेक घोटाळे करून केलेली मतदारयादी विधानसभेची होती.

बाळासाहेब थोरात म्हणाले की, विधानसभेची निवडणूक झाल्यानंतर ती मतदार यादी एक जुलैला तुम्ही आता या राज्य आयोगाला दिली. यादी दिल्यानंतर कोणतही पुनर्विलोकन जे असतं ते सहा सात महिन्यामध्ये करण्यात आलं नाही. कोणत्या दुरुस्त्या करण्यात आल्या नाहीत. पुन्हा नवीन नाव नोंदण्यासाठी मोहीम करण्यात आली नाही. ते म्हणाले की, सगळ्या दोषांसहित एक जुलैला ती मतदार यादी ही राज्य आयोगाला दिली आहे. जे चुकीच आहे ते दुरुस्त केलं पाहिजे होतं, पण ते केलेलं नाही. ती जबाबदारी केंद्रीय आयोगाची असूनही त्यांनी काहीच केलेलं नाही. आता राज्य निवडणूक आयोग म्हणतो आमची जबाबदारी नाही.

या घोळामध्ये दोष असलेली पूर्णपणे यादी मतदानाला जाणार आहे. ही काय निकोप निवडणूक आहे असं मानण्याचं कारण नाही. या सर्व बाबींवर निवडणूक आयोग उत्तर सुद्धा द्यायला तयार नाही, अशी अवस्था आहे. या सर्व दोषांसहित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीला सामोरं जाणं हे अत्यंत चुकीच आहे आणि जनतेला मान्य नाही. निकोप निवडणूक हा आपला पाया आहे लोकशाहीचा तोच उद्धवस्त करण्यात निघालेला आहे. याच्यामध्ये पूर्णपणे राजकीय हस्तक्षेप असला पाहिजे अस आम्हाला वाटतंय, असा आरोपही त्यांनी केला.

### नितीश कुमारांच्या जदयुकडून

निवडणुकीच्या रणांगणात उतरवले आहेत.

मंत्री विजयकुमार चौधरी यांना पुन्हा एकदा सरायरंजन मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे. मंत्री श्रवणकुमार यांना नालंदातून आणि मंत्री सुनिलकुमार यांना भोरे येथून निवडणुकीत उतरवले आहे.

जदयुच्या पहिल्या ५७ उमेदवारांच्या यादीत २७ नवे चेहरे आहेत. तर, गतवर्षीच्या निवडणुकीत पराभव झालेले ११ उमेदवारही मैदानात आहेत. राज्यातील बाहुबली नेत्यांनाही स्थान देण्यात आलं असून मोकामा येथून अनंतसिंह, एकमातून धुमलसिंह आणि कुचाएकोट मतदारसंघातून अमरेंद्र पांडे यांना तिकीट दिलं आहे. हे तिन्ही नेते आपल्या क्षेत्रात, मतदारसंघात प्रभावशाली आहेत. त्यात, अनंतसिंह यांनी मंगळवारीच आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. यासह जेदयुच्या पहिल्या यादीत ५ मंत्र्यांना पुन्हा संधी देण्यात आली आहे.

१८ आमदारांना पुन्हा संधी

विद्यमान आमदार असलेल्या १८ उमेदवारांना पुन्हा संधी देत जदयुने विधानसभेच्या मैदानात उतरवलं आहे. मात्र, दोन विद्यमान आमदारांचे तिकीट कापण्यात आलं आहे. विशेष म्हणजे चिराग पासवान यांच्याकडून दावा करण्यात येणाऱ्या ५ मतदारसंघात जेदयुने आपले उमेदवार दिले आहेत. त्यामुळे, येथील महागठबंधनमध्ये वाद होऊ शकतो. कारण, सोनबरसा, अलौली, राजगीर, एकमा आणि मोरवा या ५ मतदारसंघातून जदयुचे उमेदवार जाहीर करण्यात आले आहेत.

जनता दल युनायटेड पक्षाने ५७ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली असून यात एकही मुस्लिम उमेदवार नाही. मात्र, २०२० च्या विधानसभा निवडणुकीत पक्षाने ३ मुस्लिम उमेदवारांना संधी दिली होती. डुमरांव मतदारसंघातून अंजुम आरा उमेदवार होते, यंदा तेथून राहुल सिंह यांना तिकीट देण्यात आलं आहे. दरभंगा ग्रामीण मतदारसंघात २०२० मध्ये फराज फातमी उमेदवार होत्या, आता ईश्र्वर मंडल यांना येथून तिकीट दिलं आहे. तर, कांटी मतदारसंघातून गत निवडणुकीत मोहम्मद जमाल यांस टिकट देण्यात आलं होतं. पण, यंदाच्या निवडणुकीत अजीत कुमार यांना जदयुने मैदानात उतरवलं आहे.

## माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



**बुलढाणा/प्रतिनिधी :** भारताचे माजी राष्ट्रपती. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती आज जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुहासिनी गोणेवार यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

## उमरखेड नगरपरिषद निवडणुकीसाठी मूळ प्रारूप मतदार यादीत झालेल्या गंभीर त्रुटींविषयी तक्रार

### एमडीएफ ची निवडणूक आयोगाकडे तात्काळ दुरुस्तीची मागणी




दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** नगरपरिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मूळ प्रारूप मतदार यादीत मोठ्या प्रमाणावर घोळ, चुका व विसंगती झाल्याचे स्पष्ट झाले आहे. अनेक पात्र मतदारांची नावे वगळली गेल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व संभ्रम निर्माण झाला आहे.प्रभागनिहाय लोकसंख्या व मतदारसंख्येतील तफावत अत्यंत चिंताजनक आहे. अनेक प्रभागांमध्ये हजारो मतदारांचे नाव यादीतून वगळले गेले असल्याचे दिसून येते. यामुळे येणाऱ्या नगरपरिषद निवडणुकांमध्ये मोठ्या संख्येने पात्र मतदार मतदानापासून वंचित राहण्याची शक्यता आहे, प्रभाग रचना नूसार रचनेच्या चतु : सिमेच्या आतील भाग म्हणजेच जे प्रगणक गट सामील आहे ते मतदार असणे आवश्यक आहे . कर्तव्या वर असेलेल्या कर्मचाऱ्यांनी सर्व रचनेची अस्त व्यस्त करुन टाकले प्रगणक गट बदलले गेले. जे निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेस धक्का देणारे आहे.

तसेच, काही प्रभागांमध्ये लोकसंख्या वाढ झालेली असतानाही मतदारसंख्या कमी झालेली दिसते. ही बाब अत्यंत संशयास्पद असून मतदार यादीच्या तयार प्रक्रियेत गंभीर त्रुटी, दुर्लक्ष किंवा संगनमत असल्याची शंका निर्माण करते. असे निवेदन महाराष्ट्र डेमोक्रेटीक फोरम तर्फे मुख्य निवडणूक आयोग, जिल्हाधिकारी,उपविभागीय अधिकारी, मुख्याधिकारी नगर यांना देण्यात आले.

मागण्या - उमरखेड नगरपरिषद क्षेत्रांतील प्रारूप मतदार यादीचे तात्काळ पुनर्परीक्षण करावे. ,मतदारांच्या तक्रारींसाठी विशेष हेल्पडेस्क किंवा तक्रार निवारण केंद्र स्थापन करण्यात यावे ,ज्यांच्या नावे वगळली गेली आहेत अशा नागरिकांना नाव समाविष्ट करण्यासाठी अतिरिक्त संधी द्यावी,संबंधित निवडणूक अधिकाऱ्यांकडून अंतर्गत चौकशी व जबाबदारी निश्चित करावी,तक्रारीवरील कारवाईबाबत लेखी अहवाल सार्वजनिक करावा. दोषी कर्मचाऱ्यांना बडतर्फ करण्यात यावे,न्याय्य व पारदर्शक निवडणूक प्रक्रियेच्या दृष्टीने यावर तात्काळ कारवाई करून नागरिकांना न्याय द्यावा. अश्या मागण्याचे चे निवेदन देण्यात आले.

निवेदन देतांना फ़िरोज़ अंसारी, साकिब इकबाल, मुहम्मद खालिद, शाहिद इक़बाल, मोहसिन राज, मुहम्मद जावेद मंसूरी, मुहम्मद साबिर, सै रफीक, फुरकान खान, शेख नदीम,अशफाक अली, सोहेल खान, मुनव्वर खान, महेमुद खान, कलीम राज, मिनाज अहेमद, सै सलीम,तस्लीम अहेमद एमडीएफ चे संयोजक उपस्थित होते.

## डोणगाव जिल्हा परिषद सर्कलमध्ये रंगत चढली!

### स्थानिक उमेदवारांना प्राधान्याचे संकेत

दैनिक आपला विदर्भ




**मेहकर/प्रतिनिधी :** आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मेहकर तालुक्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. विविध पक्षांतील दिग्गजांनी उमेदवारीसाठी जोर लावण्यास सुरुवात केली असून जनसंपर्क मोहिमेला वेग आला आहे.

अलीकडेच चर्चेत आले होते की मेहकर येथील सुपुत्र सुद्धा या सर्कलमधून आपले राजकीय बळ आजमावण्याच्या तयारीत आहेत. विशेष म्हणजे, या सुपुत्राचा संबंध सत्ताधारी शिवसेना (शिंदे गट) या गटाशी असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती. त्यामुळे या सर्कलमधील समीकरणे अधिकच रोचक झाली होती.मात्र, आपला विदर्भला सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, डोणगाव जिल्हा परिषद सर्कलमध्ये स्थानिक उमेदवारांना प्राधान्य मिळणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळाले आहेत. यामुळे या सर्कलमधील राजकीय रंगत अधिकच वाढली असून स्थानिक पातळीवर अनेक इच्छुकांनी हालचाली सुरू केल्या आहेत. उमेदवारी मिळविण्यासाठी पडद्यामागे चढाओढ सुरू झाली आहे.

राजकीय वर्तुळात असा कानोकानी बोलला जात आहे की, या वेळेस स्थानिकांना संधी मिळण्याची शक्यता अधिक आहे. मात्र, अंतिम निर्णयावर सर्वांचे लक्ष केंद्रीत झाले आहे. उमेदवारी प्रस्थापित नेत्याला मिळणार की कुठल्या नव्या चेहऱ्याला हे पाहणे आता सर्वात महत्त्वाचे ठरणार आहे. एकंदरीत, डोणगाव सर्कलमधील राजकीय रंगत चांगलीच वाढली असून आगामी काही दिवसांत या सर्कलमधून कोणाचा झेंडा फडकणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## इंडियन रेड क्रॉस सोसायटी कार्यालयाचे जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते उद्घाटन

### रेडक्रॉस सोसायटी होणार सामाजिक सेवेचा वटवृक्ष - डॉ. किरण पाटील

दैनिक आपला विदर्भ






**बुलढाणा/प्रतिनिधी :** रेडक्रॉस सोसायटी ही आपल्या जिल्ह्यासाठी नवी असली तरी तिचं कार्य मोठे आहे. या कार्यात प्रत्येकाने थोडा वेळ समाजासाठी दिला, तर ही संस्था लवकरच एक मोठा वटवृक्ष बनेल आणि समाजाला त्याची सावली लाभेल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी रेडक्रॉस सोसायटीच्या उद्घाटन प्रसंगी केले.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रांगणात इंडियन रेड क्रॉस सोसायटी या सेवाभावी संस्थेच्या नवीन कार्यालयाचे उद्घाटन व सेवाकार्याचा शुभारंभ जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांच्या हस्ते आज करण्यात आले. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार, सहा. जिल्हा शल्य चिकित्सक तथा पदसिद्ध उपाध्यक्ष (इंडियन रेड क्रॉस सोसायटी) डॉ. भागवत भुसारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. कैलास झिने, स्त्री रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. प्रशांत पाटील, दिव्यांग व पुनर्वसन संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेश छाजेड, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता जितेंद्र काळे, इंडियन रेड क्रॉस सोसायटी बुलढाणाचे कार्याध्यक्ष विनोद जवरे, उपकार्याध्यक्ष ॲड.जयसिंग देशमुख, सचिव रवींद्र लहाने, कोषाध्यक्ष विकास दळवी आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. पाटील म्हणाले की, रेडक्रॉस सोसायटी या संस्थेचे आज प्रतीकात्मक वृक्षारोपण केले आहे. आता त्याचे संगोपन आणि विकास ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. संस्था लहान असताना तिचे रक्षण आणि पोषण केल्यास भविष्यात सर्वांना त्याचा लाभ होतो. रेडक्रॉसने स्वतंत्र उपक्रम राबवण्यापेक्षा विद्यमान सामाजिक संस्था व संघटनांशी समन्वय साधावा. दंत चिकित्सक संघटना, आयुर्वेदिक संस्था, आपत्ती मित्र संघटना, दिव्यांग पुनर्वसन केंद्र, तसेच विविध शैक्षणिक संस्था यांच्याशी समन्वय साधून एकत्रित सामाजिक उपक्रम राबविण्याचे आवाहन त्यांनी केले.

जिल्हाधिकारी पुढे म्हणाले की, संस्थेचे कार्यालय सुरळीत चालवण्यासाठी कार्यालयाचे देखभाल, वीज बिल, कर्मचारी मानधन, तसेच नोंदी व रजिस्टर यांसारख्या खर्चासाठी सर्वांनी आर्थिक सहकार्य करावे. रेडक्रॉसचे कार्य वाढवणे ही मोठी जबाबदारी असून, हे कार्य सर्वांच्या सहभागानेच यशस्वी होईल, असे त्यांनी नमूद केले. विशेषतः दिव्यांगांसाठी मोफत सहाय्यक उपकरणे पुरविण्याचे कार्य, तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी शैक्षणिक उपक्रम राबवण्यावर त्यांनी भर दिला.

आपल्या व्यवसायाबरोबर समाजासाठी वेळ देणे ही खरी सेवा आहे. जिल्ह्यातील औद्योगिक संस्था, पतसंस्था आणि प्रभावशाली व्यक्तींनी या सेवाभावी कार्यात पुढाकार घेतला, तर रेडक्रॉस सोसायटी ही एक प्रभावी सामाजिक शक्ती म्हणून उभी राहील आणि गोरगरिबांना त्याचा प्रत्यक्ष लाभ मिळेल,'' असे प्रतिपादन डॉ. पाटील यांनी केले.

इंडियन रेड क्रॉस सोसायटी या सेवाभावी संस्थेच्या कार्याची माहिती प्रास्ताविकातून इंडियन रेड क्रॉस सोसायटी कार्याध्यक्ष विनोद जवरे यांनी दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन उज्वला वर्मा यांनी तर आभार महेंद्र सौभाग्य यांनी केले.

### वादानंतर 'मनाचे श्लोक' चित्रपटाचे नाव बदलले:धार्मिक संघटनांच्या विरोधानंतर निर्णय, नवीन नावासह १६ ऑक्टोबरला होणार प्रदर्शित

**मुंबई/प्रतिनिधी :** अभिनेत्री आणि दिग्दर्शक मृण्मयी देशपांडे हिचा मनाचे श्लोक हा चित्रपट नावामुळे वादाच्या भोवऱ्यात अडकला होता. संत रामदास स्वामींच्या ग्रंथाशी संबंधित मनाचे श्लोक हा पवित्र शब्द चित्रपटासाठी वापरणे धार्मिक भावना दुखावणारे आहे, अशी भूमिका काही धार्मिक संघटनांनी घेतली होती. या तीव्र विरोधामुळे अखेर चित्रपटाचे नाव बदलण्यात आले आहे. आता हा चित्रपट तू बोल ना या नावाने १६ ऑक्टोबरपासून पुन्हा प्रदर्शित होणार आहे.

अभिनेत्री मृण्मयी देशपांडे हिची प्रमुख भूमिका असलेला आणि तिनेच दिग्दर्शित केलेला मनाचे श्लोक हा चित्रपट १० ऑक्टोबर रोजी प्रदर्शित झाला, मात्र प्रदर्शनाच्या दिवशीच पुण्यातील अनेक चित्रपटगृहांमध्ये हिंदूत्ववादी धार्मिक संघटनांनी एकत्र येत चित्रपटाच्या नावाला विरोध केला आणि चित्रपटाचे शो बंद पाडले. जोपर्यंत नाव बदलले जात नाही, तोपर्यंत सिनेमा प्रदर्शित होऊ देणार नाही, अशी भूमिका त्यांनी घेतली होती. यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षानेही यात उडी घेत, कलाकारांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य मिळाले पाहिजे, अशी भूमिका मांडली होती.

तू बोल ना या नव्या नावाने गुरुवारी प्रदर्शित

या सर्व घडामोडींनंतर, मृण्मयी देशपांडेने या चित्रपटाचे नाव बदलले आहे. आता हा चित्रपट आता तू बोल ना या नव्या नावाने प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. १६ ऑक्टोबर रोजी, म्हणजेच गुरुवारी, हा चित्रपट पुन्हा महाराष्ट्रभर प्रदर्शित होत आहे.

# शिंदखेडा तालुक्यात टॉवरवर चढून शेतकऱ्याचे अनोखे आंदोलन

दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी** : शिंदखेडा (ता. धुळे) शिंदखेडा तालुक्यातील मेथी गावात औष्णिक (थर्मल) प्रकल्पासाठी दिलेल्या जमिनीबाबत शेतकऱ्यांना अद्याप सानुग्रह अनुदान मिळाले नसल्यामुळे आज एक अनोखे आंदोलन पाहायला मिळाले. ज्ञानेश्वर भुरेसिंग गिरासे या शेतकऱ्याने थेट सोलर कंपनीच्या आवारातील मोबाईल टॉवरवर चढून 'शोले' चित्रपटातील वीरूच्या अंदाजात आंदोलन करत प्रशासनाचे लक्ष वेधले.

मेथी परिसरात उभारण्यात आलेल्या औष्णिक प्रकल्पासाठी काही वर्षांपूर्वी शेतकऱ्यांची जमीन अधिग्रहित करण्यात आली होती. अधिग्रहणावेळी शासन व कंपनीकडून सानुग्रह अनुदान देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, अनेक वेळा पाठपुरावा करूनही आजपर्यंत शेतकऱ्यांना ते अनुदान मिळालेले नाही. त्यामुळे ग्रामस्थ व शेतकरी संतप्त झाले असून, त्यांनी आज सकाळपासून आंदोलनाचा पवित्रा घेतला.

या पार्श्वभूमीवर ज्ञानेश्वर गिरासे यांनी थेट मोबाईल टॉवरवर चढून आंदोलन केले. त्यांनी टॉवरवरून प्रशासनाविरोधात घोषणाबाजी केली व ''आम्हाला न्याय द्या, नाहीतर खाली उतरणार नाही,'' असा इशारा दिला. त्यांच्या या कृतीमुळे गावात तसेच परिसरात एकच खळबळ उडाली. दरम्यान, शेतकऱ्यांच्या आंदोलनाची माहिती मिळताच पोलिस व तहसील प्रशासन घटनास्थळी दाखल झाले. प्रशासनाने गिरासे यांच्याशी संवाद साधून त्यांना खाली उतरवण्याचा प्रयत्न सुरू केला. गावातील नागरिक आणि सहकारी शेतकरी मोठ्या संख्येने घटनास्थळी जमले होते.

शेतकऱ्यांची प्रमुख मागणी अशी आहे की, महाजन कंपनी व जिल्हा प्रशासनाने प्रकल्पासाठी जमीन दिलेल्या सर्व शेतकऱ्यांना तत्काळ सानुग्रह अनुदान वितरित करावे, तसेच याबाबत ठोस लेखी आश्वासन द्यावे. वारंवार आंदोलन करूनही प्रशासनाने दखल न घेतल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.





या अनोख्या आंदोलनामुळे प्रशासनाच्या कामकाजावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, शेतकऱ्यांचा संताप शमवण्यासाठी स्थानिक प्रशासनाने तातडीने पुढाकार घेण्याची मागणी होत आहे.

## विविध वृत्त...

### जेवलीत बौद्ध समुदायाविरुद्ध अपमानास्पद पोस्ट प्रकरण : आरोपीवर गुन्हा दाखल, अट्रॉसिटी कायद्यानुसार कारवाईची मागणी




दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी** : उमरखेड तालुक्यातील जेवली येथे समाजात तेढ निर्माण करण्याच्या उद्देशाने सोशल मीडियावर अपमानास्पद मजकूर पोस्ट केल्याची घटना समोर आली आहे. श्रीनिवास करतार पडवाळे (वय २८, रा. जेवली) याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच बौद्ध समुदायावर आक्षेपार्ह आणि जातीयवादी मजकूर जेवली ग्रामपंचायत कार्यालयाच्या व्हॉट्सअॅप गटावर पोस्ट केल्याचा आरोप आहे.

या पोस्टमुळे गावातील बौद्ध समाजाच्या भावना दुखावल्याने संतप्त बौद्ध अनुयायांनी बिटरगाव पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यांनी आरोपीवर अनुसूचित जाती आणि जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा तसेच संबंधित कलमान्वये कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

तक्रारीच्या आधारे बिटरगाव पोलिसांनी श्रीनिवास पडवाळे याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम ३५३ अंतर्गत गुन्हा नोंदविला असून पुढील तपास पोलिस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. गावात या घटनेनंतर तणावाचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी खबरदारीचे उपाय केले आहेत.

### शेतकऱ्यांच्या फसव्या मदत पॅकेजचा निषेध मेहकर येथे शासन निर्णयाची होळी



**मेहकर/प्रतिनिधी** : अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने १० ऑक्टोबर रोजी जाहीर केलेले मदत पॅकेज फसवे आणि अपुरे असल्याचा आरोप करत क्रांतिकारी शेतकरी संघटनेने आज मेहकर येथे तीव्र आंदोलन केले. उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर शासन निर्णयाची होळी करून शासनाच्या उदासीनतेचा निषेध व्यक्त करण्यात आला.

या आंदोलनात डॉ. ज्ञानेश्वर टाले, सहदेव लाड, गणेश गारोळे, प्रवीण उतपुरे, सलीम शहा, महेश व शरद देशमुख, शिंदे जाधव मामा आणि एकनाथ वाघ यांच्यासह अनेक शेतकरी सहभागी झाले होते. ''कागदी मदत नको खरी मदत द्या!'', ''शासन जागे व्हा!'' अशा घोषणांनी परिसर दुमदुमला.

शेतकरी नेत्यांनी सांगितले की अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे संपूर्ण नुकसान झाले असून, शासनाने केवळ औपचारिक सवलती जाहीर केल्या आहेत. त्यांनी शासनाकडे प्रत्येक शेतकऱ्याला थेट आर्थिक मदत, तात्काळ पीकविमा देयके, मोफत बियाणे-खते वितरण आणि निष्काळजी अधिकाऱ्यांवर कारवाई अशा ठोस मागण्या केल्या. शेतकऱ्यांनी पुढील काळातही शासनाच्या शेतकरीविरोधी धोरणांविरोधात लढा सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.

# येलो बेल्ट कराटे स्पर्धेत लोणारच्या विद्यार्थ्यांचा विजयदिप उजळला!

## महाराणा किक मार्शल आर्ट कराटे अकॅडमीच्या ३० विद्यार्थ्यांनी मिळवला येलो बेल्टचा मान

दैनिक आपला विदर्भ

**लोणार** : कला, शिस्त आणि आत्मसंरक्षण यांचा सुंदर संगम असलेल्या कराटे कलेत लोणार शहरातील विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा आपले कौशल्य सिद्ध केले आहे. महाराणा किक मार्शल आर्ट कराटे अकॅडमी, लोणार यांच्या वतीने आयोजित येलो बेल्ट कराटे स्पर्धा दिनांक १२ ऑक्टोबर २०२५ रोजी लोणार येथे उत्साहात पार पडली. स्पर्धेत विद्यार्थ्यांनी काता, कुमिते, पंचिंग, ब्लॉकिंग, रोड फाईट, नान चाकू चालवणे, काठी फिरवणे, लॉकिंग मूव्हमेंट, बेसिक वीट फोडणे आणि बचावात्मक तंत्र अशा विविध कराटे प्रकारांत आपले कौशल्य दाखवत उत्तम कामगिरी केली.

**स्पर्धेत येलो बेल्ट मिळवणारे विजयी विद्यार्थी**

अभीश्री संदिप बारबुडे, वरद निलेश जाधव, समर्थ विठ्ठल सरकटे, मैथिली अनिलकुमार काळे, भक्ती विठ्ठल सरकटे, एंकातकुमार संतोष राठोड, अर्जण अशिष नागरे, तेजस भगवान जाधव, नेत्रा शिवहारी शिंदे, श्वेता कल्याणी नरोटे, प्रणव शिवहारी शिंदे, श्रिया कल्याणी नरोटे, विराट राजेश ताटे, अथर्व संदीप चव्हाण, समीकक्षा जितेंद्र झिणे, राजनंदिनी किशोर मोरे, भूमिका उमेश सानप, आधीरा विशाल लोणारकर, आयुष्या विशाल लोणारकर, समर्थ शिवाजी भांबर्गे, भाविका कैलास कुलाल, रुद्र दीपक राठोड, लहू मनोज जाजडा, ओमकार लक्ष्मण चाटे, ज्ञानेश्वरी सतीश सांगळे, वेदांत राजकुमार आघाव, आराध्या संदीप सांगळे, समर्थ प्रकाश सानप, कृष्णा ज्ञानेश्वर राठोड, स्वरूप संदीप सांगळे यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांनी परिश्रम, शिस्त आणि निष्ठेच्या जोरावर येलो बेल्ट मिळवून आपल्या पालकांचे, शाळेचे व तालुक्याचे नाव उज्ज्वल केले आहे.



स्पर्धेचे मार्गदर्शन मुख्य कराटे प्रशिक्षक संतोष सखाराम जाधव, तसेच प्रशिक्षक सुनिल आढे, चंचल दाते, आर्यन वानखेडे, हर्षदीप आठवले यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष विलास भागवतराव इरतकर तर प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस इंगळे उपस्थित होते.सर्व विजयी विद्यार्थ्यांचे मान्यवरांच्या हस्ते अभिनंदन करण्यात आले. लोणार शहरातील या तरुण कराटेपटूंच्या कामगिरीमुळे परिसरात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### शेअर मार्केटच्या नावाखाली निवृत्त जीएसटी अधिकाऱ्याची ४५ लाखांची फसवणूक!

**अंबरनाथ/प्रतिनिधी** : अंबरनाथ शहरात एका निवृत्त जीएसटी अधिकाऱ्याची तब्बल ४५ लाख रुपयांची ऑनलाइन फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी अंबरनाथ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांकडून तपास सुरू आहे.

**इंटरनेटवर सापडलेल्या दोन बनावट ट्रेडिंग कंपन्यांमध्ये गुंतवले ४५ लाख; अंबरनाथ पोलिसांकडे गुन्हा दाखल**



प्रकाश रामकृष्ण पाटील (निवृत्त जीएसटी अधिकारी) यांनी निवृत्तीनंतर मिळालेल्या रकमेचा योग्य परतावा मिळावा, या उद्देशाने शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला. इंटरनेटवर शोध घेतल्यानंतर त्यांनी "GIAT ICICI Group" आणि "L&T Motilal Oswal Stock Market" या नावाच्या दोन ऑनलाइन ट्रेडिंग कंपन्यांमध्ये गुंतवणूक केली. या कंपन्यांची नावे प्रसिद्ध वित्तीय संस्थांच्या नावाशी साधर्म्य राखत असल्यामुळे पाटील यांना फसवणुकीचा संशय आला नाही.

टप्प्याटप्प्याने त्यांनी एकूण ४५ लाख रुपये या बोगस कंपन्यांमध्ये गुंतवले. त्यानंतर त्यांच्या खात्यांमध्ये एक कोटी आणि सव्वा कोटी रुपयांच्या काल्पनिक नफा दाखवणारे खोटे रेकॉर्ड तयार करण्यात आले. मात्र पाटील यांनी त्या खात्यातील रक्कम काढण्याचा प्रयत्न केला असता, संबंधित कंपन्यांनी पुन्हा पैसे जमा करण्याची अट घातली. यानंतर कंपन्यांकडून होणारी टाळाटाळ पाहता त्यांना आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले आणि त्यांनी अंबरनाथ पोलिसांकडे धाव घेतली.या प्रकरणी अंबरनाथ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक शब्बीर सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

अंबरनाथ पोलीसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, ऑनलाइन गुंतवणूक किंवा ट्रेडिंगसाठी कोणतीही वेबसाइट वापरण्यापूर्वी तिची प्रामाणिकता तपासूनच व्यवहार करावा.



# निंभार्णीचा शेतकरी ललित ढेवले: मोसंबी बागेतून ५ लाखांचा नफा

दैनिक आपला विदर्भ

अमरावती जिल्ह्यातील मोर्शी तालुक्याच्या निंभार्णी गावातील शेतकरी ललित ढेवले यांनी शेतीत केलेली पाच वर्षांची मेहनत आता फळ देत आहे. त्यांनी २०१९ मध्ये २.५ एकर जमिनीत मोसंबीची लागवड केली, आणि पारंपरिक पिकांना मागे टाकत आज या बागेतून ५ लाख रुपयांचा नफा कमावला आहे.

ललित ढेवले यांनी सुरुवातीच्या वर्षी केळीची लागवड केली, त्यानंतर आंतरपीक म्हणून कोबी, फ्लॉवर आणि टरबूज घेतले. मल्चिंग पेपरच्या बेडवर टरबूज लागवड केल्यामुळे या पिकाला चांगला फायदा झाला, तसेच मोसंबी बागेसही प्रोत्साहन मिळाले. सिंचनासाठी इनलाइन ड्रिप पद्धतीचा वापर केला गेला, आणि खतांचा योग्य वेळेवर पुरवठा व कीड नियंत्रणामुळे मोसंबी फळांचा दर्जा उंचावला.

यंदा राज्यभर दमदार पाऊस झाला, परंतु योग्य व्यवस्थापनामुळे ललित ढेवले यांची बाग सुरक्षित राहिली. २.५ एकरात त्यांनी २० टन मोसंबीचे उत्पादन मिळवले, बाजारात किलोला २५ रुपयांचा भाव मिळाला. यासाठी त्यांनी १ लाख रुपये खर्च केला होता, तर त्यातून मिळालेले उत्पन्न ५ लाख रुपये आहे.

ललित यांच्या यशामुळे परिसरातील अनेक शेतकरी मोसंबी रोपांची मागणी करण्यास सुरुवात केली आहे. ही मागणी लक्षात घेऊन ललित ढेवले येत्या पावसाळ्यात रोपवाटीका सुरु करणार आहेत, ज्यातून स्थानिक शेतकऱ्यांना खात्रीशीर रोप मिळतील आणि त्यांना उत्पन्नाचे नविन साधन उपलब्ध होईल.

ललित म्हणतात, ''मेहनत, योग्य व्यवस्थापन आणि निचऱ्याच्या जमिनीची साथ ही यशाची गुरुकिल्ली आहे. मोसंबी बागेचं गणित आता जुळलं आहे आणि चेहऱ्यावरच समाधान दिसतं.''

# बुलढाणा पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांना सायबर फसवणूक टाळण्याचे सविस्तर मार्गदर्शन

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : सायबर क्राईमविषयी नागरिकांमध्ये जागरूकता वाढवण्यासाठी आज मेहकर येथील जानेफळ चौकात विशेष पथनाट्याचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम बुलढाणा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

या पथनाट्यात सायबर फसवणूक कशी घडते, तिचे विविध प्रकार, तसेच नागरिक स्वतःची सुरक्षा कशी करू शकतात, याची सविस्तर माहिती देण्यात आली. कार्यक्रमादरम्यान पोलीस प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे महत्त्व पटवून दिले आणि खालील खबरदारी घेण्याचा सल्ला दिला:

**सायबर फसवणूक टाळण्यासाठी महत्त्वाच्या टिप्स**

अज्ञात लिंकवर क्लिक करू नका: ई-मेल, मेसेज किंवा सोशल मीडियावरील लिंकवर विश्वास नसल्यास क्लिक करू नका.

**वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवा**

पासवर्ड किंवा बँक माहिती कधीही इतरांशी शेअर करू नका.

फक्त अधिकृत प्लॅटफॉर्म वापरा: ॲप्स आणि वेबसाईट्स अधिकृत असल्याची खात्री करा.

सावधान: सायबर फसवणूक ही अचानक घडणारी घटना आहे. सतर्क राहणे आणि माहितीची खात्री करणे हाच सर्वांत प्रभावी मार्ग आहे.




**नागरिकांसाठी हेल्पलाइन**

सायबर फसवणूक किंवा इतर ऑनलाइन गुन्ह्यांबाबत तक्रारीसाठी नागरिक १९३० किंवा ११२ या हेल्पलाइन नंबरवर संपर्क साधू शकतात.

**बुलढाणा पोलीस प्रशासनाची भूमिका**

सदर उपक्रमामुळे नागरिकांना डिजिटल सुरक्षा आणि ऑनलाइन फसवणूक ओळखण्याची क्षमता वाढत आहे. पोलीस प्रशासनाचे म्हणणे आहे की अशा पथनाट्यांमुळे नागरिकांना फक्त माहिती मिळत नाही, तर सुरक्षित राहण्यासाठी योग्य मार्गदर्शनही मिळते.

यावेळी मेहकर पोलीस स्टेशनचे कर्मचारी, तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित नागरिकांनी पोलीस प्रशासनाचे कौतुक करत, अशा उपक्रमांमुळे सायबर सुरक्षा संदर्भातील जनजागृती अधिक व्यापक होईल, अशी आशा व्यक्त केली.